सत्र खटला क्र.१९/२०२५
सीएनआर नं.MHTH230002452025
निशाणी क्र.२४

MHTH230002452025

| | | |
|---|---|---|
| खटला दाखल दिनांक | : | २१.०१.२०२५ |
| खटला नोंदणी दिनांक | : | २१.०१.२०२५ |
| खटला निकाल दिनांक | : | २७.०७.२०२६ |
| कालावधी | : | ०१ ०६ ०६ |
| | | वर्ष महिना दिवस |

**भाग —'अ'**

**मे. विद्यमान अपर जिल्हा व सत्र न्यायालय, वसई**
**(पिठासीन अधिकारी — डॉ.श्रीमती.जी.डी.निर्मले )**

**सत्र खटला क्रमांक —१९/२०२५**
**निशाणी क्र.२४**

**प्रथम खबर अहवाला, गुन्हा क्र. I—३४१/२०२२, विरार पोलीस स्टेशन, ठाणे**

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष/ फिर्यादी** | **:** | **महाराष्ट्र शासन**<br>**( विरार पोलीस ठाणे मार्फत)** |
| **अभियोग पक्षातर्फे** | **:** | **वकील — श्री.पी.बी.बनकर**<br>**सहाय्यक सरकारी वकील** |
| **आरोपींचे नांव** | | (१) **श्रीमती.कल्पना रणजित झा**<br>वय ४० वर्षे, धंदा — गृहिणी,<br>राहणार — रूम नं.०२, ए जीवदानी कृपा चाळ, सहकारी नगर, विठ्ठल कंपाऊंड, विरार पूर्व, ता.वसई, जिल्हा—पालघर. |
| **आरोपींतर्फे** | | **वकील— श्री.हितेश जिवल** |

**भाग —'ब'**

| | | |
|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याचा दिनांक | २४.०३.२०२२ |
| २. | प्रथम खबर अहवाल दिनांक | २४.०३.२०२२ |
| ३. | दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | ०२.०१.२०२३ |

| | | |
|---|---|---|
| ४. | **दोषारोप निश्चिती दिनांक** | **१२.०६.२०२६** |
| ५. | **पुरावा सुरु झाल्याचा दिनांक** | **२२.०६.२०२६** |
| ६. | **न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक** | **२७.०७.२०२६** |
| ७. | **न्यायनिर्णय दिल्याचा दिनांक** | |
| ८. | **शिक्षा सुनावणीची दिनांक** | ...... |

## आरोपीचा तपशील

| **आरोपीची श्रेणी** | **आरोपीचे नांव** | **अटक दिनांक** | **जामीन दिनांक** | **गुन्हयाचे कलम** | **निर्दोष किंवा दोषी** | **शिक्षा सुनावली** | **बंदीवान म्हणून असलेला कालावधी फौजदारी प्रक्रिया विधान कलम—४२८ करीता** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** |
| १ | श्रीमती. कल्पना रणजित झा | २१.१०.२०२२ | २१.१०.२०२२ | ३५३, ५०४, ५०६, सह कलम ३४ | | — | — |

## भाग —'क'

**अ) अभियोग पक्ष :**

| **अनुक्रमांक** | **साक्षीदारांची नांवे** | **पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलिस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार)** |
|---|---|---|
| सा.क्र.१/नि.क्र.**०७** | छबिलदास पुंडलिक दळवी | फिर्यादी |
| सा.क्र.२/नि.क्र.**२१** | सुरेंद्र सुभाष शिवदे | तपासी अंमलदार |

**ब) बचाव पक्षाचे साक्षीदार जर असतील तर :**

| अनुक्रमांक | साक्षीदारांची नांवे | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलिस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क) न्यायालयीन साक्षीदार असतील तर रू**

| अनुक्रमांक | साक्षीदारांची नांवे | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलिस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| न्या.सा.क्र. १ | निरंक | निरंक |

**अभियोग / बचाव / न्यायालय इ. ची निशाणी यादी रू**

**ड) अभियोग पक्ष :**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १ | ०८ | प्रथम खबर अहवाल |
| २ | ०९ | छापिल प्रथम खबर अहवाल |
| ३ | १० | घटनास्थळ पंचनामा |

**इ) बचाव पक्षः**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ई) न्यायालयीन निशाणी:**

| **अनुक्रमांक** | **निशाणी क्रमांक** | **तपशील** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड). भौतीक वस्तू :**

| **अनुक्रमांक** | **भौतिक वस्तू क्रमांक** | **तपशील** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |
| निरंक | निरंक | निरंक |

**<u>न्यायनिर्णय</u>**
**( दिनांक २७.०७.२०२६ रोजी उद्घोषित केला)**

**१**. आरोपी हे भारतीय दंड विधान कलम ३५३, ५०४, ५०६, सह कलम ३४ च्या अपराधासाठी संपरीक्षाधिन आहे.

**२**. अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे, आरोपी क्र.१ रूम नं.२, जीवदानी कृपा चाळ, सहकार नगर, विरार पूर्व, तालुका वसई, जिल्हा पालघर येथे राहत असून त्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या ग्राहक आहेत व त्यांचा ग्राहक क्रमांक ००१५२६०३२३३७ आहे. सदर विदयुत बिलाची रक्कम थकीत झाल्याने दिनांक २४.०३.२०२२ रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे वरिष्ठ तंत्रज्ञ फिर्यादी श्री.छबिनदास पुंडलीक दळवी व साक्षीदार हे नियमानुसार विदयुत पुरवठा खंडीत करण्यासाठी दुपारी १२.०० वाजेच्या सुमारास आरोपी क्र.१ राहत असलेल्या वर नमूद ठिकाणी गेले. फिर्यादी रूम नं.२ च्या बाहेर मिटर बॉक्समध्ये वीज पुरवठा खंडीत करत असतांना, रूम नं.२ मधून एक मुलगा बाहेर आला व त्यांनी फिर्यादीचा हात खेचून बाजूला झटकला. त्यांनी फिर्यादीला धक्काबुक्की केली व शिवीगाळ केली. फिर्यादी त्यांच्या वीज पुरवठा खंडीत करून चाळी बाहेर आले असता विधीसंघर्ष ग्रस्त बालकाची आई व तिनेसुध्दा वीज पुरवठा खंडीत केल्याचा राग मनात धरून फिर्यादीला

शिवीगाळ केली, दमदाटी केली व धक्काबुक्की केली. फिर्यादी व त्यांचे सहकारी जतीन खोब्रागडे कार्यालयात परतले व घडलेला प्रकार वरिष्ठांना सांगितला. त्यानंतर, फिर्यादी श्री.छबीलदास पुंडलीक दळवी यांनी दिनांक २४.०३.२०२२ रोजी विरार पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली. सदर फिर्याद वरून विरार पोलीस स्टेशन येथे आरोपींविरूध्द भा.द.वि. कलम ३५३, ५०४, ५०६, सह कलम ३४ अन्वये गुन्हा क्रमांक I—३४१/२०२२ नोंदविण्यात आला.

**३**. तपासादरम्यान तपासी अधिकारी — सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, बक्कल नं.९१०१६, यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला, फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केले, साक्षीदारांचे जबाब नोंदवले आणि तपासाअंती आरोपींविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** कलम ३५३ भारतीय दंड विधान हा गुन्हा सत्र न्यायालयात चालण्यासारखा असल्याने न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग ( कोर्ट नं.३) वसई यांनी दिनांक १२.१२.२०२४ च्या आदेशानुसार प्रस्तुत प्रकरण या न्यायालयात चालवून निकाल करणेकामी वर्ग केले.

**५**. आरोपी वरील आरोप (निशाणी क्र.०४), भारतीय दंड विधानाचे कलम ३५३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये नोंदवण्यात आला व तो त्यांना मराठीमध्ये वाचून दाखवला व समजून सांगितला असता तिने गुन्हा नाकबूल करून संपरीक्षेची मागणी केली.

**६**. साक्षीदारांची उलट—तपासणी, आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहितचे कलम ३१३ नुसार नोंदवलेल्या जबाबातील (निशाणी क्र.२३) उत्तरावरून आरोपीने तिच्यावरील आरोपांचे खंडण करून ती निर्दोष असल्याचे कथन केल्याचे दिसून येत आहे. मात्र तिने बचावात कोणताही पुरावा सादर केला नाही.

**७.** अभिलेखावरील पुरावा वाचला, अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री.पी.बी.बनकर आणि आरोपीतर्फे विधिज्ञ श्री.हितेश जिवल यांचा युक्तीवाद

लक्षात घेवून खालील मुद्दे विचारार्थ उपस्थित झाले आहेत. सदर मुद्यांवरील निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे नमूद केली आहे.

| अनु.क्रं. | : | मुद्दे | : | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | : | आरोपीने बालसंघर्षग्रस्त बालक यांच्यासोबत संगनमत करून फिर्यादी लोकसेवक यांना कायदेशीर कर्तव्य पार पाडण्यापासून धाकाने परावृत्त करण्यासाठी हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग केले असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | : | नाही |
| २. | : | आरोपीने बालसंघर्षग्रस्त बालक यांच्यासोबत संगनमत करून शांतताभंग करण्याचा उद्‌देशाने अपमान करून प्रक्षोभित केले असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | : | नाही |
| ३. | : | आरोपीने बालसंघर्षग्रस्त बालक यांच्यासोबत संगनमत करून फिर्यादीस फौजदारीपात्र धाकदपटशा व जबर दुखापत घडवून आणण्याची धमकी दिली होती असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | : | नाही |
| ४. | : | काय आदेश ? | : | आरोपी दोषमुक्त. |

## कारणमिमांसा

**मुद्‌दे क्र.१ ते ४ करिता** :—

८. आरोपीवरील दोषरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे एकूण दोन साक्षीदार तपासण्यात आले, फिर्यादी छबिलदास पुंडलिक दळवी (सा.क्र.१) (निशाणी क्र.०७) व तपासी अंमलदार सुरेंद्र सुभाष शिवदे (सा.क्र.२) (निशाणी क्र.२१)

वर तपासण्यात आले आहे.

९. आरोपीवरील आरोप निर्विवाद सिध्द करण्याची जबाबदारी अभियोग पक्षाची आहे. प्रस्तुत प्रकरणांमध्ये आरोपीविरूध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी साक्षीदार क्रमांक १ फिर्यादी छबिलदास पुंडलिक दळवी यांची साक्ष निशाणी क्र.०७ प्रमाणे नोंदण्यात आली होती. अभियोग पक्षाची भिस्त साक्षीदार क्रमांक १ यांचे साक्षीवर होती. परंतु आरोपीवरील दोषारोप सिध्द करण्या इतपत पुरावा फिर्यादीच्या साक्षतून आलेला नाही.

१०. प्रस्तुत आरोपीबद्दल फिर्यादीने असे सांगितले आहे की विदयूत पुरवठा खंडीत करून बाहेर येत असताना प्रस्तुत आरोपीने त्यांना शिवीगाळ केली. फिर्यादीच्या जबाबाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येत आहे की, आरोपीने शिवीगाळ केल्याबद्दल फिर्यादीचे व्यक्तव्य मोघम स्वरूपाचे आहे. आरोपीने कोणत्या शब्दात शिवीगाळ केली, याबद्दल फिर्यादीने काहीही एक कथन केले नाही. तसेच प्रस्तुत आरोपीने फिर्यादीच्या कामात अडथळा केल्याबद्दल, त्यांना धक्काबुक्की केल्याबद्दल किंवा फौजदारीपात्र धाकदपटशा व जबर दुखापत घडवून आणण्याची धमकी दिल्याबद्दल काहीही एक कथन केलेले नाही.

११. फिर्यादीने दिलेली वर नमूद साक्ष त्यांनी दिलेल्या फिर्यादच्या विसंगत आहे. फिर्यादीच्या साक्षीतून आरोपीने वर नमूद गुन्हा केल्याचे सिध्द होत नाही.

१२. तपासी अंमलदार – श्री सुरेंद्र शिवदे (सा.क्र.२) (निशाणी क्र.२१) आहेत. त्यांनी घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र.१०) तयार केल्याचे सांगितले, तसेच साक्षीदारांचे जबाब नोंदवून दोषारोपपत्र दाखल केल्याचे सांगितले. प्रस्तूत प्रकरणात फिर्यादीच्या साक्षीत आरोपीविरूध्द दोषारोप सिध्द करण्या इतपत पुरावा अभिलेखावर आलेला नाही. अशा परिस्थितीत तपासी अंमलदाराच्या साक्षीचा अभियोग पक्षास काहीही एक फायदा होत नाही.

**१३**. अभिलेखावरील संपूर्ण साक्षी पुराव्याचे अवलोकनावरून असे निदर्शनास येते की, आरोपीने भारतीय दंड विधान, कलम ३५३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये गुन्हा केल्याचे पुराव्याअभावी संशयातीतरित्या सिध्द करण्यास अभियोगपक्ष अयशस्वी ठरले आहे. अशा परिस्थितीत, आरोपीला सदर अपराधाकरिता दोषी ठरवता येवू शकत नाही. सबब, मुद्दा क्र.१ ते ४ वरील निष्कर्ष नकारार्थी देण्यात येत आहे.

**१४**. उपरोक्त कारणास्तव अंतिम आदेश खालीलप्रमाणे.

**आदेश**

**१.** आरोपी श्रीमती.कल्पना रणजित झा यांना फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, कलम २३५(१) अन्वये भारतीय दंड विधान कलम ३५३, ५०४, ५०६ सह कलम ३४ या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**२.** आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामिनपत्र रद्द करण्यात येत आहे.

**३.** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७—अ च्या पुर्ततेसाठी जामीन रू.७,५००/— चा जामीन द्यावा. सदर जामीन व बंधपत्र या आदेशापासून ०६ महिन्यापर्यंत अस्तित्वात राहील.

Digitally signed by GURPREETKAUR DAULATSINGH NIRMALE
Date: 2026.07.27 17:22:50 +0530

**(डॉ.श्रीमती.जी.डी.निर्मले)**
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
न्यायालय क्र.३, वसई

दिनांक **२७.०७.२०२६**